# जिल्हा परिषद अहमदनगर

## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष्

## जलस्वराज्य 2, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत कंत्राटी पद्धतीने भरावयाच्या पदासाठी अर्ज करण्यासाठी उमेदवारांस महत्वाच्या सुचना

१. पदाची शैक्षणिक अर्हता, आवश्यक अनुभव, आर्थिक मोबदला इ. खालीलप्रमाणे आहे.

| क्र | पदाचे नाव | नियुक्तीचा प्रकार | पद संख्या | दरमहा मानधन | किमान शैक्षणीक पात्रता | वयोमर्यादा | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वित्त व संपादणूक सल्लागार | कंत्राटी | 01 | रु. - 13000/- व प्रोत्साहन वेतन – रु. 5000/- | वाणिज्य शाखेतील पदवी किमान 55 टक्के गुणांसह, MS-CIT | कमाल 40 वर्ष | 2 वर्ष स्वयंसेवी संस्था अथवा शासकीय विभागा मध्ये |
| 2 | स्वच्छता तज्ञ | कंत्राटी | 01 | रु. - 13000/- व प्रोत्साहन वेतन – रु. 5000/- | Diploma in Civil Engineering, संगणकाचे MS-Office ज्ञान आवश्यक | कमाल 40 .वर्ष | स्वयंसेवी अथवा शासकीय योजनेच्या पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रामधील बांधकमाच्या कार्यक्रमामधील किमान दोन वर्षांचा |
| 3 | सल्लागार (पाणी गुणवत्ता उपविभाग) | कंत्राटी | 01 | रु. 8000/- | कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा रसायनशास्त्र विषया मधील पदवी धारकास प्राधान्य दिले जाईल | कमाल 50 वर्ष मात्र सेवानिवृत्त सरकारी/ निमसरकारी कर्मचारी यांचे करिता 65 वर्ष | 1 वर्ष |

### 2. भरती प्रक्रियेतील सर्वसाधारण सुचना:

अ) नमुद पदासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेला आहे. सदरचा अर्ज नमुना डाऊनलोड करुन घ्यावा.

आ) विहित नमुन्यातील अर्ज पोस्टाने किंवा समक्ष अर्ज दि.06/03/2020 पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी 10.00 ते सायं – 5.45 पर्यंत (सुटटीचे दिवस वगळुन) सादर करावेत. अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकाच्या कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा, अपुर्ण स्वरुपातील माहिती भरलेल्या, ईमेलद्वारे पाठविलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

इ) अर्ज पाठविताना पाकिटावर ज्या पदासाठी अर्ज केलेला आहे. त्या पदाचा ठळक अक्षरात उल्लेख करावा.

ई) संबंधित उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर जिल्हा परिषद कार्यालयामार्फत अर्जाची छाननी झालेनंतर पात्र/अपात्र उमेदवारांची यादी जि.प.च्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. तदनतंर केवळ पात्र उमेदवारांनाच मुलाखतीसाठी / गटचर्चेसाठी बोलावण्यांत येईल.

उ) नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा अन्य कारणास्तव विहित दिनाकास लेखी पेपर/ मुलाखत / गट चर्चा घेणे शक्य न झाल्यास पुढील दिनांक निश्चित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना असतील.

ऊ) निवड प्रक्रियेमध्ये वेळोवेळी दिल्या जाणा-या सूचनांचे पालन करण्याची तसेच निवड प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

ए) उमेदवाराने विहित नमुना अर्जातील सर्व माहिती भरणे बंधनकारक आहे. उमेदवाराला जिल्हा परिषद कार्यालयाकडून तातडीने संपर्क करणे, भरती प्रक्रियेतील प्रत्येक स्तरावरील माहिती उमेदवाराला तात्काळ कळविण्यासाठी चालु स्थितीमधील भ्रमणदुरध्वनी व ई-मेल पत्ता देणे आवश्यक आहे. भरती प्रक्रियेच्या कालावधीत उमेदवाराने आपला ई-मेल व जिल्हा परिषदेचे संकेतस्थळाची नियमितपणे पहाणी करून माहिती घ्यावी.

ऐ) कंत्राटी पध्दतीने पद भरतांना अर्हता प्राप्त उमेदवारांपैकी गट चर्चेसाठी (Group Discussion) उमेदवार निवडण्यात येतील. गट चर्चेमधुन 1: 5 या प्रमाणात गुणानुक्रमानुसार उमेदवार निवडुन त्यांच्या मुलाखती घेण्यांत येतील. गट चर्चा आणि मुलाखतीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे गुणानुक्रमांनुसार उमेदवारांची निवड करण्यांत येईल. सल्लागार (पाणी व गुणवत्ता) व ग्रामलेखा समन्वयक यांना गट चर्चा लागू राहणार नाही.

ओ) निवड प्रक्रियेत पात्र ठरलेल्या उमेदवाराची मूळ कागदपत्रे तपासल्यानंतरच त्यांना नियुक्ती आदेश देणेत येईल. कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास कोणत्याही स्तरावर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल किंवा नियुक्ती रद्द करण्यात येवून संबंधितावर कायदेशिर कारवाई करण्यात येईल. तसेच उमेदवारांना गट चर्चेसाठी व मुलाखतीसाठी प्रवास खर्च किंवा इतर कोणताही भत्ता दिला जाणार नाही.

औ) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना नियुक्ती अधिकारी या नात्याने कोणत्याही उमेदवाराची अंतिम निवड करण्याचे अथवा नाकारण्याचे संपुर्ण अधिकार राहतील. निवड प्रक्रिये दरम्यान किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवार अपात्र असल्याचे लक्षात आल्यानंतर त्या उमेदवारास निवड प्रक्रियेच्या त्या टप्प्यावर बाद केले जाईल किंवा नियुक्ती नंतर सेवेतुन कमी केले जाईल. तसेच वरील पद भरती प्रक्रियेत कोणताही आणि केव्हाही बदल करण्याचा, पद संख्येत बदल करण्याचा अथवा भरती प्रक्रिया रद्द करण्याचे संपुर्ण अधिकार राहतील.

अं) सदरची पदे शासनाने दिलेल्या सुचनानुसार पुर्णपणे कंत्राटी असुन या पदांना शासन सेवेचे फायदे लागू नाहीत. सदरची पदे केवळ योजना चालु असे पर्यंत अगर निधी उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात चालु राहतील. या सेवेच्या आधारे शासनाच्या कोणत्याही नियमित सेवेत सामावुन घेतले जाणार नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर करीता

(स्थळ प्रतीवर मा. मु.का.अ यांची स्वाक्षरी असे.)

<u>अर्जाचा नमुना</u>

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद अहमदनगर
जलस्वराज्य 2,स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत
कंत्राटी रिक्त पदांची भरती

| |
|---|
| या ठिकाणी स्वतःचा अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व त्यावर उमेदवाराने स्वतःची स्वाक्षरी करावी. |

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहमदनगर.

विषय- जलस्वराज्य 2,स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा अंतर्गत कंत्राटी ------------- पदासाठी अर्ज.

१) संपुर्ण नाव (मराठीत):-

| स्वतःचे नाव | वडीलांचे/पतीचे नाव | आडनाव |
|---|---|---|
| | | |

२) संपुर्ण नाव (इंग्रजीत):-

| स्वतःचे नाव | वडीलांचे/पतीचे नाव | आडनाव |
|---|---|---|
| | | |

३) पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता:-

मु./पोस्ट. --------------------------------------------------------तालुका- -------------------

जिल्हा- ------------------------------------ पिनकोड- -------------------

भ्रमणध्वनी क्र. ---------------------------------------

४) ई-मेल आय डी:- -----------------------------------------

५) अर्जदार स्त्री आहे की पुरूष:- ----------------

६) अर्जदाराची जन्मतारीख (अंकामध्ये) (शालांत परिक्षा प्रमाणपत्र/शाळा सोडल्याच्या दाखल्यानुसार)

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

७) अर्जदाराचे दि.29.02.2020 रोजीचे वय:-

| दिवस | महिने | वर्ष |
|---|---|---|
| | | |

८) अर्जदाराचा प्रवर्ग:- ( √ अशी खुण करावी.)

| अ.जा | अ.ज | वि.जा.अ | भ.ज. ब | भ.ज.क | भ.ज. ड | वि.मा.प्र | इ.मा.व | एसईबीसी | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

९) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता:-

| अ.क्र. | अर्हता | बोर्ड/विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५ | | | | |
| ६. | | | | |

१०) अर्जदाराचा अनुभव:-

| अ.क्र. | अनुभव प्रमाणपत्र देणाऱ्या संस्थेचे नाव | अनुभव प्रमाणपत्र दिनांक | अनुभव कालावधी |
|---|---|---|---|
| १) | | | |
| २) | | | |
| ३) | | | |

११) राष्ट्रीयत्व:- भारतीय/अभारतीय

१२) महाराष्ट्राचा मुळचा रहीवासी आहे काय? होय / नाही

१३) अर्जदार विवाहीत आहे की अविवाहीत? विवाहीत / अविवाहीत

वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता माझ्यापाशी आहे, याची खात्री करूनच हा अर्ज मी करत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास नोकरी गमवण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कारवाईस मी पात्र व बांधील राहीन व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण:-

दिनांक:-

अर्जदाराची सही व नाव